# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

जा. क्र. ५५७/२०१०-११ | दिनांक : ४ नोव्हेंबर २०१०

**(फक्त सभासदांसाठी)**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची इ.सन २००९-१० (१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०) ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१० रोजी दुपारी २.०० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाट्यमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य द्यावे, ही विनंती.

## -सभेपुढील विषय -

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.
२. परिषदेच्या १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
३. परिषदेच्या १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
४. इ.सन. २०१०-११ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
५. इ.सन २००१०-११ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६. अमेरिका येथे ९० वे नाट्यसंमेलन संपन्न होण्यापूर्वी व संमेलन संपन्न झाल्यानंतरच्या घटनांची सभेस माहिती देणे.
७. नाट्यसंकुल आणि नाट्य परिषद या दोन्ही संस्था वेगवेगळ्या करण्याबाबत विचार व निर्णय.
८. नाट्यसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
९. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
१०. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

आपली,

(स्मिता तळवलकर)
प्रमुख कार्यवाह

## विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. १६ नोव्हेंबर २०१० ते २० नोव्हेंबर २०१० पर्यंत प्रतिदिनी सायं. ५ ते ७ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. २२ नोव्हेंबर २०१० पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक १६ नोव्हेंबर २०१० पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल व मागणी केल्यास उपलब्ध करुन दिला जाईल.
५. ज्या सभासदांचे पत्ते बदलले आहेत त्यांनी कृपया आपला नवीन पत्ता कळवावा.

## महत्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) चौदा हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास भरमसाठ वाढलेला टपाल खर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी केवळ अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाट्यसंमेलन, सत्कार आणि अन्य नाट्यविषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येतील. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.